**प्रेसनोट दि. २०/०४/२०१९**

**"आश्रय हॉटेल येथील बेकायदेशिर हुक्का बारवर गुन्हे शाखेने छापा टाकुन केली दोघांना अटक "**

दिनांक ०४ ऑक्टोबर २०१८ पासुन महाराष्ट्र शासनाने राज्यात हुक्का बारवर बंदी घातली आहे. त्यानुसार कोणाही व्यक्तीस, महाराष्ट्र राज्यात कोठेही हुक्का धुम्रपानास बंदी आहे.त्याच प्रमाणे कोणाही व्यक्तीस, महाराष्ट्र राज्यात कोठेही हुक्का धुम्रपानासाठी सेवा उपलब्ध करुन देणे यांस सुध्दा बंदी आहे. महाराष्ट्र शासनाने , हुक्का बारवर बंदी घातलेनंतर सुध्दा काही हॉटेल व्यावसायीक पुणे शहरात अवैधरित्या आर्थिक फायदा मिळवण्यासाठी,ग्राहकांना धुम्रपानासाठी तंबाखुजन्य हुक्का पुरवित असल्याचे आढळुन आले आहे.

दिनांक १९/०४/२०१९ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. सुनिल दोरगे, सहा पो निरीक्षक श्री बापु रायकर,तसेच इतर पोलीस स्टाफ असे दत्तवाडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, त्यांना बातमी मिळाली की, " पर्वती रोडवरील आश्रय हॉटेल येथे हुक्का बार चालु आहे " अशी बातमी मिळाले नंतर अंमली पदार्थ विरोधी पथकातील सहा पो निरीक्षक श्री बापु रायकर व स्टाफ यांनी आश्रय हॉटेल येथे अचानक छापा टाकला असता, नमुद हॉटेलचे टेरेसवर हुक्का सेवन करणारे १० इसम आढळुन आले. तसेच त्या ठिकाणी तेथील कामगार ०१) व्यंकटरमण सुब्बैया बोम्मण्णा, वय ३१ वर्षे रा. लेन नंबर -६ बी टी कवडे रोड घोरपडी गांव,पुणे, मुळ गाव- रा.सिएसपुरम, ता.कणगिरी, जि.ओंगोल, राज्य- आंध्रप्रदेश हा ग्राहकांना हुक्का पुरवित असल्याचे आढळुन आले. त्याचे कडील अधिक चौकशीत,नमुद कामगार हा हरि बाबु अद्दंकी रा.बी टी कवडे रोड, घोरपडी गांव, पुणे याचे सांगण्यावरुन ग्राहकांना हुक्का पुरवित असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे सदर ठिकाणी हुक्का पिणारे १० ग्राहकांवर सुध्दा सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने अधिनियम सन २००३ चे कलम ४,२१ अन्वये कारवाई केली आहे.त्याच प्रमाणे नमुद हॉटेल येथील कामगार ०१) व्यंकटरमण सुब्बैया बोम्मण्णा, मॅनेजर -०२) हरि बाबु अद्दंकी , तसेच हॉटेल मालक -०३) विशाल विलास पाटील, वय ३८ वर्षे,रा. जी-३०६,रम्यनगरी, बिबवेवाडी, पुणे यांचे विरुध्द सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने अधिनियम सन २००३ चे कलम ४-अ,२१-अ अन्वये दत्तवाडी पोलीस ठाणे येथे दखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर हॉटेलमधुन सुमारे ११,७००/- रु चे हुक्का बारचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयात हॉटेल मधील कामगार ०१) व्यंकटरमण सुब्बैया बोम्मण्णा व हॉटेल मालक -०२) विशाल विलास पाटील यांना अटक करण्यात आली आहे.सदर गुन्हयाचा पुढील दत्तवाडी पोलीस ठाणे हे करीत असुन,दोघांनाही मा.न्यायालया समोर हजर केले असता, मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दुसरे न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी दोन दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

सदरची कारवाई मा. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) मा. भानुप्रताप बर्गे सहा. पोलीस आयुक्त गुन्हे, पुणे, पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक बापु रायकर, पोलीस उप निरीक्षक तागड व पोलीस कर्मचारी अविनाश शिंदे, बाबा शिर्के, राहुल जोशी, शिवाजी राहीगुडे, महेंद्र पवार, प्रफुल्ल साबळे, मिना पिंजण, हेमा ढेबे, विशाल शिंदे, मनोज साळुंके, राजकुमार पाटील, सचिन चंदन, अमित छडीदार यांनी केली आहे.